## *माजी विद्यार्थिनी व पालक संघटना समिती.*

### *कामकाज अहवाल – सन 2018/2019*

सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालयाच्या वाटचालीत माजी विद्यार्थिनींचा कृतीशील सहभाग असावा व त्यांच्या अनुभव समृध्द जीवनाचे महाविद्यालयासाठी दिशादर्शक म्हणून योगदान लाभावे या हेतूने माजी विद्यार्थिनींचा मेळावा दरवर्षी घेतला जातो. तसेच पालकांशी ही सुसंवाद साधला जातो.

1) सन 2018/19 चे शैक्षणिक वर्षात महाविद्यालयाचे प्राचार्य , रयत शिक्षण संस्थेचे ऑडिटर डॉ. अरूण आंधळे यांच्या अध्यक्षतेखाली व समितीच्या प्रमुख माननिय गीतांजली कदम व संचालक मंडळाची 2 वेळा बैठक घेण्यात आली. रयत शिक्षण संस्थेची जन्मशताब्दी तसेच महाविद्यालयातील कामकाजा बाबत त्यांच्याशी चर्चा करण्यात आली.

2) दि. 07/09/2018 रोजी बी.ए.,व बी.कॉम या विभागाच्या माजी विद्यार्थिनींचा मेळावा घेण्यात आला. या मेळाव्यास 65 विद्यार्थिनी उपस्थित होत्या. महाविद्यालयाची प्रगती ,अभ्यासक्रम व शॉर्ट टर्म कोर्सेस याबाबत मार्गदर्शन चर्चा , सुसंवाद साधण्यात आला. फीडबॅक द्वारे त्यांची मते जाणून घेणेत आली.

3) महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी व जिजामाता प्रॅक्टींसिंग स्कूलच्या प्राचार्या मा.सौ.चैताली भोसले यांनी महाविद्यालयास 10,000/– रू. ची देणगी दिली.

महाविद्यालयातील बऱ्याच उपक्रमांनां माजी विद्यार्थिनींनी उपस्थिती दर्शवली.

Mrs. S.S. Shinde

श्रीमती एस.एस.शिंदे

विभाग प्रमुख

माजी विद्यार्थिनी व पालक संघटना समिती

सा.फुले म.म.वि.सातारा.

# सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालयामध्ये माजी विद्यार्थिनी मेळावा संपन्न

सातारा (दि.२२/०१/२०२०) येथील रयत शिक्षण संस्थेच्या सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालयामध्ये माजी विद्यार्थिनी मेळावा दि.२२ /०१/२० रोजी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक मा. विनय झोटे (प्रकल्प अधिकारी महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र सातारा) होते. अध्यक्ष सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालयाचे मा .प्रा.चार्य डॉ. अरुण आंधळे होते.

या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रा.श्रीमती शिंदे एस. एस. म्हणाल्या ,' पालकांइतकीच विद्यार्थिनींची काळजी शिक्षकही घेत असतात. माजी विद्यार्थिनीचे मेळावे हे शिक्षक -विद्यार्थिनीमधील जुने नाते,ऋणानुबंध नव्याने जोडणारे पूल आहेत. माजी विद्यार्थिनीना एक सामाजिक म्हणून ह्या मेळाव्यांना उपस्थित राहून गुरुकृपा व समाज ऋण यातून मुक्त व्हावे.'

या कार्यक्रमात विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना मा. विनय झोटे यांनी म्हणाले की ,उद्योग व व्यवसायामध्ये पुरुषांच्या बरोबर महिलांनीही यावे यासाठी केंद्र शासनाने स्त्री पुरुष समानतेला महत्व दिले आहे. यासाठी सूक्ष्म-लघू-मध्यम उद्योग – एमएसएमई मंत्रालयानेही महिला उद्योजकांना सक्षम करण्यासाठी पावले उचलली आहेत. प्रधानमंत्री रोजगार निर्मिती योजना (पीएमईजीपी) अंतर्गत जानेवारी २०१९ पर्यंत तब्बल १.३८ लाख प्रकल्प हाती घेण्यात आले होते. पीएमईजीपीअंतर्गत सुरू झालेल्या प्रकल्पांमध्ये महिला उद्योजकांनी सुरू केलेल्या प्रकल्पांचा वाटा सुमारे ३० टक्के आहे.

महिला हीच प्रथम उद्योजक असते. म्हणून ज्या विद्यार्थिनीना स्वतंत्र उद्योग व व्यवसाय सुरु करायचे आहेत.अशा विद्यार्थिनीनी या क्षेत्रात यायला

काहीच हरकत नाही असे सांगून यावेळी त्यांनी महिला उद्योग व व्यवसायासाठी शासणाच्या विविध अनुदान देणाऱ्या योजना सांगितल्या.यामध्ये मुद्रा योजना,ट्रेड योजना, महिला उद्यम निधी योजना,अशा योजनांची माहिती दिली.तसेच शासकीय पातळीवरून सातारा जिल्ह्यातील शेंद्रे येथे प्रियांका शू मार्ट व शासन यांच्यामार्फत लेदर वर्क्स नावाचा ट्रेनिंग कोर्स महिलांसाठी चालविला जात आहे. तरी हा कोर्स ज्या विद्यार्थिनीना करायचा आहे अशा विद्यार्थिनी संपर्क साधावा.आजकाल शाषकीय नोकऱ्या कमी झालेल्या आहेत.म्हणून विद्यार्थीनिनी स्वतंत्र उद्योग/ व्यवसायाकडे वळावे व आपल्या पायावर खंबीरपणे उभे राहावे असे सांगितले.

या कार्यक्रमात प्रा.फटे यांनी 'महाविद्यालय एक झलक 'या माध्यमातून त्यांनी महाविद्यालयामध्ये असणाऱ्या भौतिक सुविधा व विद्यार्थिनीसाठी चालविलेले विविध शॉर्ट टर्म कोर्सेस इ.ची पी.पी.टी. द्वारे माहिती दिली. याच कार्यक्रमात प्रसिद्ध कवी मा.श्री.भगवान अवघडे यांनी **'हे स्त्रिये' नावाची कविता सादर केली.**

यावेळी सौ.भारती जगताप ,श्रीमती शारदा बर्गे ,कु.रुचिरा इंगळे ,माधुरी घोरपडे,मृणालिनी घाडगे ,सोनाली सपकाळ ,आशा राम गवळी,मृणाल साबळे व जिजामाता प्रॅक्टीसिंग स्कूलच्या मुख्याध्यापिका श्रीमती वैजयंती भोसले इ. माजी विद्यार्थिनीनी आपली मनोगते व्यक्त केली.

मा. उपप्राचार्या (कला शाखा ) श्रीमती डॉ. एस. एस. घार्गे मॅडम यांनी ,' विद्यार्थिनी व शिक्षक यांच्यामध्ये एक जवळचे नाते निर्माण व्हावे व विद्यार्थिनींचे आयुष्य चांगल्या घडावे हाच हेतू शिक्षकांचा असतो. या समाजामध्ये बदल घडवण्याची मोठी शक्ती मुलींमध्ये आहे. राजकीय सामाजिक

व शैक्षणिक सक्षमीकरणाचे काम त्यांच्या हातून होणार आहे व त्यासाठीच महाविद्यालय प्रयत्न करीत आहे .यासाठी माजी विद्यार्थिनीचा सहभाग हवा असे सांगून विद्यार्थिनीना बहुमूल्य मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणात मा.प्राचार्य डॉ. अरुण आंधळे म्हणाले ,' हे महाविद्यालय आपले आहे असे समजून आपण या महाविद्यालयामध्ये नेहमी येत जावे.आपण ज्या क्षेत्रात काम करीत आहात अशा क्षेत्राची आपण या महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थीनीना माहिती द्यावी.ही माहिती नक्कीच त्यांना प्रेरणादायी ठरेल. यावेळी त्यांनी महाविद्यालयात चालणाऱ्या २५ प्रकारचे शॉर्ट टर्म कोर्सेसची माहिती सांगितली. हे कोर्सेस या विद्यार्थिनीना जीवनात पुढे नक्कीच उपयोगी पडतील असे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमासाठी उपप्राचार्या मा.सौ,घार्गे एस.एस. ,डॉ.गजानन भोसले डॉ.महानवर सर,डॉ.जयश्री आफळे इ.ची उपस्थिती लाभली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.सौ. पाटील मॅडम व डॉ.ज्योती मोहोळकर यांनी केले. आभार प्रा.डॉ. रवींद्र पाटील यांनी मानले.

सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय सातारा

Smt. Surekha S. Shinde
HOD of Sociology
Savitribai Phule Mahila
Mahavidyalaya, Satara.

Principal
Savitribai Phule Mahila Mahavidyalaya
SATARA.